**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २०० नुसार फिर्यादीच्या साक्षीदाराची शपथेवर तपासणी**

मी शपथपुर्वक निवेदन करतो की –

माझे नाव – सुभाष शांताराम तामणकर.

वय – ४२ वर्षे, धंदा – नोकरी. निलीकॉन फुड डाईज अॅण्ड केमिकल्स.

राहणार –कोलाड, ता. रोहा.

फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्री. आर. बी. सावं हजर –

१. मी फिर्यादी कंपनीत गेल्या १५ ते १६ वर्षांपासून अकाऊंट डिपार्टमेंटमध्ये काम करीत आहे. आरोपीस मी ओळखतो. आरोपीस आमच्या कंपनीने मशिन खरेदीसाठी पर्चेस ऑर्डर दिली होती. त्यानुसार आरोपीने आम्हाला मशिन पुरविले व त्याचा टॅक्स इन्व्हाइस आम्हाला दिला. त्यात त्याने मशिनची रक्कम व १२.५ टक्के वॅट च्या रक्कमेची मागणी केली होती. त्या टॅक्स इन्व्हाइस नुसार आम्ही आरोपीस संपूर्ण रक्कम अदा केली. या वॅटच्या रक्कमेची नोंद आम्ही आमच्या विक्रीकर विवरणपत्रात दाखविली होती. या रक्कमेचा आम्ही परतावा मागितला. परंतू विक्रीकर विभागाने आम्हाला कळविले की, आरोपीने उपरोक्त बिलावरील १२.५ टक्के वॅटच्या रक्कमेचा भरणा त्यांच्या कार्यालयात केला नाही. त्यामुळे आम्हाला या रक्कमेचा परतावा मिळाला नाही. म्हणून आमचे आर्थिक नुकसान झाले. या बाबतची कागदपत्रे मी ओळखू शकतो. आरोपीने वॅटची रक्कम न भरता ती स्वतःकडे ठेवली त्यामुळे आरोपीने विश्वासघात करुन आमच्या कंपनीची फसवणूक केली. त्यामुळे आम्ही प्रस्तुतची फिर्याद दाखल केली आहे.

मला माझी तपासणी विधीज्ञांच्या हजेरीत वाचून दाखवली, बरोबर लिहिले आहे म्हणून मी खाली सही करतो.

साक्षीदाराची सही/आंगठा

माझे समक्ष

-- स्वाक्षरी--
(स. दि. कमलाकर)
दि. २३.१०.२०१९ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा.